# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

**Date – 11 January 2026**

**Time 18.10 to 18.20**

**Language Marathi**

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ११ जानेवारी २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- सोमनाथचा इतिहास हा विजय, पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता
- महापालिका निवडणुकीचा प्रचार शिगेला

आणि

- न्यूझीलंडविरुद्ध विजयासाठी भारतासमोर ३०१ धावांचं लक्ष्य

****

सोमनाथचा इतिहास हा विजय आणि पुनर्निर्माणाचा तसंच आपल्या पूर्वजांच्या पराक्रम, त्याग आणि बलिदानाचा इतिहास आहे, असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते आज गुजरातमधल्या सोमनाथ इथं सोमनाथ स्वाभिमान पर्वानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. विदेशी आक्रमकांनी सोमनाथ आणि भारताला नष्ट करायचा अनेकदा प्रयत्न करूनही सोमनाथ आणि भारत नष्ट झाले नाहीत, आपल्या पूर्वजांनी प्राणाचं बलिदान देऊन त्यांचं रक्षण केलं, असं पंतप्रधान म्हणाले. त्याआधी सोमनाथ स्वाभिमान पर्वाचा भाग म्हणून भव्य शौर्ययात्रा निघाली. गुजरातच्या विविध भागातून आलेले १०८ अश्व आणि डमरू वादक पथक या यात्रेत सहभागी झाले. मोदी यांनी फुलांनी सजवलेल्या वाहनावर आरूढ होत यात्रेचं नेतृत्व केलं. यावेळी पंतप्रधानांनी ढोल वादनही केलं. रस्त्याच्या दुतर्फा जमलेल्या भक्तगणांनी यात्रेवर पुष्पवर्षाव केला आणि हर हर महादेवचा जयघोष

केला. यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी उभारलेल्या व्यासपीठांवर देशभरातून आलेल्या कलाकारांनी नृत्याचं सादरीकरण केलं.

****

चालू आर्थिक वर्षात देशाची वित्तीय तूट सकल देशांतर्गत उत्पादनाच्या ४ पूर्णांक ४ दशांश टक्केपर्यंत रोखण्याचं उद्दिष्ट साध्य होण्याची शक्यता असल्याचं पीडब्ल्यूसी या पतमानांकन संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. ही तूट यापेक्षाही कमी राहील, आणि यामुळे आर्थिक व्यवस्थापनातली भारताची मजबूत स्थिती जागतिक पातळीवर अधोरेखित होत असल्याचं या संस्थेचे प्रतिनिधी राणेन बॅनर्जी यांनी म्हटलं आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं नुकतंच जीडीपी दरवाढीचं उद्दिष्ट १० पूर्णांक १ दशांश टक्क्यावरून ८ टक्क्यांवर आणल्यानं वित्तीय तूट कमी ठेवण्याचं उद्दिष्ट सरकार पूर्ण करू शकेल का, याबद्दल साशंकता निर्माण झाली होती. मात्र, एकंदर आकडेवारी अर्थसंकल्पातल्या अंदाजाइतकीच आहे, त्यामुळे वित्तीय तूट रोखण्याचं लक्ष्य सहज पूर्ण होईल, असा विश्वासही बॅनर्जी यांनी व्यक्त केला.

****

येत्या १४ जानेवारी रोजी साजऱ्या होणाऱ्या त्रिदल माजी सैनिक दिनानिमित्त तिन्ही सैन्यदलांच्या निवृत्त अधिकाऱ्यांच्या विशेष संचलनाचं आयोजन आज मुंबईत मरीन ड्राईव्ह इथे करण्यात आलं होतं. या संचलनात तिन्ही सैन्य दलांचे निवृत्त अधिकारी, नौदलाचे कॅडेट्स, एनसीसी कॅडेट्स यांनीही सहभाग घेतला होता. भारतीय सैन्य दलाचे पहिले फील्ड मार्शल के. एम. करिअप्पा यांच्या निवृत्तीच्या स्मरणार्थ दरवर्षी १४ जानेवारी रोजी त्रिदल माजी सैनिक दिन साजरा करण्यात येतो.

****

मुंबई सीमाशुल्क क्षेत्र विमानतळ आयुक्तालयानं गेल्या आठवड्यात बँकॉकहून आलेल्या प्रवाशांकडून ४५ किलोहून अधिक सुमारे ४५ कोटी रुपये किमतीचे अंमली पदार्थ जप्त केले. तसंच, दोन वेगवेगळ्या प्रकरणांत सुमारे २.७५ किलो सोनं जप्त करून संबंधित प्रवासी आणि त्यांना मदत करणाऱ्या विमानतळ कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे.

****

माजी पंतप्रधान दिवंगत लाल बहादूर शास्त्री यांच्या ६० व्या पुण्यतिथीनिमित्त आज उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी उपराष्ट्रपतीभवनात त्यांना पुष्पांजली अर्पण केली. लाल बहादूर शास्त्री यांचं जीवन साधेपणा, सचोटी आणि देशाप्रती असलेल्या अढळ निष्ठेचं प्रतीक आहे, असं त्यांनी समाजमाध्यमावर दिलेल्या आपल्या संदेशात म्हटलं आहे.

****

राज्यात पंधरा जानेवारी रोजी होणाऱ्या २९ महापालिकांच्या निवडणुकीचा प्रचार थंडावण्यासाठी तीन दिवस शिल्लक असल्यानं प्रचार शिगेला पोहचला आहे. आज मतदानाआधीच्या रविवार- सुटीच्या दिवशी विविध राजकीय पक्ष, उमेदवारांनी प्रचाराची गती आणखी वाढवली आहे. सकाळी फिरायला जाणाऱ्या मतदारांना भेटून प्रचार करण्यापासून ते प्रचार फेऱ्या, दारोदार मतदारांच्या भेटीगाठी, प्रचारसभा, बैठका यावर भर देण्यात येत आहे. सामाजिक संपर्क माध्यमांतील संदेशांचा उपयोग सुरू आहे. प्रमुख राजकीय नेते झंझावाती प्रचार दौरे करत आहेत.

****

मुंबई महापालिका निवडणुकीसाठी महायुतीचा वचननामा आज मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आला. कचरामुक्त मुंबईसह मुंबईचा पाणी प्रश्न मिटवण्यासह मिठी नदी स्वच्छ करण्याचं काम केलं जाईल असं मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितलं. बेस्ट बस आणि मेट्रोचं जाळं वाढवण्यासह आरोग्य क्षेत्रात भरीव काम करणार असल्याचं सांगून मुंबईत राहणारा मराठी माणूस बाहेर जणार नाही याची खबरदारी घेणार असल्याचंही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी बोलतांना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी, बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी निमित्त वैद्यकीय विद्यापीठ उभारणार असल्याचं सांगून लघु उद्योजकांना पाच लाख रुपये बिनव्याजी कर्ज देण्यात येईल, असं ते म्हणाले.

****

महापालिका निवडणूक प्रचारासाठी छत्रपती संभाजीनगरमध्ये हवेत उंच सोडण्यात आलेले निवडणूक चिन्हांकीत फुगे नागरिकांचं लक्ष वेधून घेत आहेत. छत्रपती संभाजीनगर इथं शिवसेनेचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची टीव्ही सेंटर मैदानात प्रचार सभा झाली. भाजपचे नेते मंत्री नितेश राणे तसंच एआयएमआयएमचे नेते अकबरउद्दीन ओवेसी यांच्या प्रचार सभाही आज नियोजित आहेत.

****

नागपूर महापालिकेच्या निवडणुकीकरिता भाजपचा वचननामा आज पक्षाचे नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जाहीर करण्यात आला.

****

जालना महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी आज विविध मतदान केंद्रांना भेट देत मूलभूत सुविधांची पाहणी केली. या पाहणीदरम्यान शहरातल्या सहा ठिकाणांवरील ४० मतदान केंद्रांची तपासणी करण्यात आली. मतदानाच्या दिवशी मतदारांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा वेळेत योग्य प्रकारे उपलब्ध करून देण्याच्या स्पष्ट सूचना जालना निवडणूक निरीक्षकांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

****

भारतीय क्रिकेट संघासमोर न्यूझीलंडविरुद्ध पहिल्या एकदिवसीय सामन्यात विजयासाठी ३०१ धावांचं लक्ष्य आहे. वडोदरा इथं सुरू या सामन्यात नाणेफेक गमावल्यानंतर न्यूझीलंड संघानं ५० षटकांत आठ बाद ३०० धावा केल्या. यात डेरेल मिचेलनं ८४, हेन्री निकोलसनं ६२ आणि डेव्हॉन कॉनवे यानं ५६ धावा केल्या. मोहम्मद सिराज, हर्षित राणा आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन खेळाडू बाद केले.

****

आई–बाप, संविधान, प्रेम आणि दुःख या साऱ्या विषयांना कवेत घेणाऱ्या एकाहून एक काव्यरचना सादर करुन लोककवी प्रा.प्रशांत मोरे यांनी छत्रपती संभाजीनगरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या पहिल्या लोककला महोत्सवाचं आज थाटात उद्घाटन केलं. या माध्यमातून राज्यातल्या सर्व २४ विद्यापीठांमधील विद्यार्थी लोककलांना एकाच मंचावर आणलं गेलं आहे. विद्यापीठातल्या नाट्यगृहाशेजारी स्वतंत्र लोककला अकादमी स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी यावेळी दिली.

****

केंद्र सरकारनं नुकतंच विकसित भारत जी राम जी विधेयक संमत केलं. या विधेयकामुळं ग्राम पंचायतींना अधिक अधिकार आणि निधी मिळणार असल्याची प्रतिक्रिया लातूर जिल्ह्याच्या उदगीर तालुक्यातल्या नागलगावचे सरपंच सुभाष मुन्ना राठोड यांनी दिली आहे. ते म्हणाले –

**बाईट – सुभाष मुन्ना राठोड**

****

सध्या राज्यात कोरडं हवामान असून किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे. मध्य महाराष्ट्र आणि कोकणात तुरळक ठिकाणी हलक्या पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

****

महिला प्रीमियर लीग क्रिकेटमध्ये, दिल्ली कॅपिटल्स आणि गुजरात जायंट्स यांच्यातला सामना आज नवी मुंबईच्या डी.वाय. पाटील मैदानावर रंगणार आहे. काल मुंबई इंडियननं दिल्ली कॅपिटलचा ५० धावांनी पराभव केला. १९६ धावांचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटलला १४५ धावा करता आल्या. हरमनप्रीत कौरला सामनावीर पुरस्कारानं गौरवण्यात आलं.

****

ग्रंथालय चळवळीचे नेते, माजी आमदार गंगाधर म्हाळप्पा पटणे यांचं वृद्धापकाळाने आज सकाळी नांदेडमध्ये एका खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते.

****

ज्येष्ठ साहित्यिक आचार्य रतनलाल सोनग्रा यांचं आज दुपारी वृद्धपकाळानं पुण्यातील खासगी रुग्णालयात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते.

****